नियमित दिवाणी दावा क्र.१५/२०१७
धोंडीबा वेनुपुरे विरुध्द बबन वेनुपुरे व इतर
CNR NO.MHPU12-001402-2016

## निशाणी क्र.३० वरील आदेश.

(दिनांक ०७/११/२०२४ रोजी पारीत)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.०७ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ७, नियम ११ प्रमाणे वादीचा दावा फेटाळणे करीता दाखल केलेला आहे.

०२. वादीने नि.क्र.४५ कडे अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविलेली आहे.

०३. प्रतिवादी क्र.०७ यांच्या म्हणण्यानुसार दावा मध्ये नमुद केलेल्या मिळकतीपैकी ०० हे. ४० आर ही मिळकत या प्रतिवादीने दिनांक २३/१२/२०११ रोजीचे नोदणीकृत खरेदीखताने प्रतिवादी कं. कं. १ यांचे कडुन कडुन कायमखुश कायमखुश नोंदणीकृत खरेदीखताने घेतलेली असुन सदरील खरेदीखत मा. दुय्यम निंबधक सो. भोर यांचे कार्यालयात अ.क्रं. ५२१ / २०११ वर नोंदविण्यात आले आहे. त्याप्रमाणे या प्रतिवादीच्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी रितसर झालेली आहे. प्रतिवादी कं. १ यांनी या प्रतिवादी बाबत नोंदणीकृत दस्त करून दिल्याची माहीती या वादीस दि.२०/१/२०१२ पुर्वीच होती त्यामुळे वादीने प्रतिवादीस विधिज्ञ श्री. टी. आर. देशमुख यांचे मार्फत दि.२०/१/२०१२ रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठवली असल्याचे दावा कलम ५ मध्ये नमुद केलेले आहे. अशा प्रकारे प्रतिवादीच्या खरेदीखताची माहीती वादीस दिनांक २०/१/२०१२ पुर्वीच झालेली असल्याने सदरील दस्त रदद् करून मिळणेसाठी वादीने दावा मुदतीच्या कायदयातील तरतुदीप्रमाणे ३ वर्षाच्या आत दाखल करणे आवश्यक होते तथापि वादीने खरेदीखताची

माहीती झाल्यापासुन सुमारे ५ वर्षानी प्रस्तुतचा दावा खरेदीखत रदद् करून मिळणेसाठी दाखल केलेला असल्याने त्यास मुदतीच्या कायदयाची बाधा येते. करीता प्रतिवादींनी वादीचा सदर दावा दिवाणी प्रकिया सहीत कं. ७ नियम ११ (डी) मधील तरतुदीप्रमाणे फेटाळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज केला आहे.

०४. वादीने प्रतिवादींच्या अर्जास नि. क्र.४५ वर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदवून अर्ज वादीस मान्य नसल्याचे कथन केले आहे. प्रस्तुत अर्जातील नमुद दि. २३/१२/२०११ रोजीचे खरेदीखत वादी व त्याचे सहहिस्सेदार यांचे संमतीशिवाय झालेले आहे. त्यामुळे सदर खरेदीखताचा व्यवहार हा या वादीवर तसेच त्यांचे सहहिस्सेदार यांचेवर बंधनकारक नसुन ते बेकायदेशीर आहे. वादीने प्र.वादीस त्यांचे विधिज्ञ श्री. टी. आर. देशमुख यांचे मार्फत पाठविलेली नोटीस प्र. वादी नं. १, २ व ४ ते ६ यांना पाठविली होती. परंतु प्रतिवादी नं. ७ ला वादीने कोणतीही नोटीस पाठविली नाही. तसेच वादीस नोटीस पाठविते वेळी सदर प्रतिवादी नं. ७ चे खरेदीदस्ताबाबत माहिती नव्हती. सदर दाव्यास मुदतीचे कायदयाची बाधा येत नाही असे कथन करुन प्रतिवादींचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

०५. अभिलेखाची पाहणी केली. वादी व प्रतिवादीतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

०६. वादी व प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन खालील मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थिती झाले असून त्याची कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निषर्क |
|---|---|---|
| ०१. | प्रस्तुतचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ७, नियम ११ प्रमाणे फेटाळण्यास पात्र आहे काय ? | नकारार्थी. |
| ०२. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>मुद्दा क्र.०१ व ०२ करीताः</u>–**

०७. अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. ७ यांनी विशिष्ट कलमाखाली प्रस्तुतचा दावा काढणेकामी ठराविक बाबींचा उल्लेख केलेला नाही. प्रतिवादी क्र. ७ यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रस्तुतचा दावा पाच वर्षांनी खरेदीखत रद्द करुन मिळणेसाठी दाखल केला असल्याने त्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येते. प्रस्तुत दाव्याची पाहणी केली असता वादीने प्रस्तुतचा दावा वाटप, ठराव आणि निरंतर ताकीदीसाठी दाखल केल्याचे दिसुन येते. तसेच वादींची प्रस्तुत दाव्यातील पहिली विनंती आहे की, दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होवुन १/३ हिस्सा त्यांचे नावे करुन देण्याचा हुकूम व्हावा. यावरुन दावा मिळकत ही वडिलोपार्जित असल्याचे त्यांचे म्हणणे असुन त्यांचे व सहहिस्सेदारांच्या संमतीशिवाय दि.२३/१२/२०११ रोजी खरेदीखत झाले आहे. मा. सुप्रिम कोर्ट यांनी नोंदविलेल्या मतानुसार दाव्याचा सदरचा प्राथमिक स्वरुपाची स्टेज खोलवर मेरिटमध्ये जाण्याचा नाही. वादींच्या इतर मागण्यांचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज समर्थनीय नाही. म्हणुन वरील बाबींचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणे योग्य राहील. सबब मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देवुन मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करण्यात येतो.

:: **<u>आदेश</u>** ::

०१. प्रतिवादी क्र. ७ यांचा (नि.क्र. ३० वरील) अर्ज नामंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाबाबत आदेश नाही.

JADHAV MEENA WAMAN Digitally signed by JADHAV MEENA WAMAN Date: 2024.11.07 17:49:17 +0530

**भोर** **( मीना वामन जाधव)**

**दिनांकः ०७/११/२०२३.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, भोर .**

## CERTIFICATE

I affirms that the contents of this P. D. F. file order are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | Hon'ble Smt. Meena W. Jadhav<br>C.J.J.D. & J.M.F.C., Bhor, Pune |
| Name of the Steno | :- | M. S. Kondhare L.G. |
| Date of Order | :- | 07/11/2024 |
| Signed by P.O. | :- | 07/11/2024 |
| Order uploaded on | :- | 07/11/2024 |